प्रकाशित एप्रिल २६,२०२३

# बजाज फाऊंडेशनने जलसंसाधन व्यवस्थापनातील कार्यासाठी CSR पुरस्कार जिंकला

- बजाज फाऊंडेशनचे विश्वस्त, श्री अपूर्व बजाज यांना महाराष्ट्राचे राज्यपाल माननीय श्री रमेश बैस यांच्या हाती पुरस्कार मिळाला. Video
- महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी बजाज फाऊंडेशनच्या प्रयत्नांचा प्रशंसा केली. Video



मुंबई २६.०४.२३

१९ एप्रिल रोजी मुंबईच्या राजभवन येथे आयोजित पुरस्कार सोहळ्यात बजाज फाउंडेशनने नवभारत CSR पुरस्कार जिंकला. हा पुरस्कार बजाज फाऊंडेशनचे विश्वस्त **श्री अपूर्व नयन बजाज** यांनी **महाराष्ट्राचे** माननीय राज्यपाल **श्री रमेश बैस** यांच्या हस्ते स्वीकारला.

बजाज फाउंडेशन ही बजाज समूहाची परोपकारी शाखा आहे आणि काळजीपूर्वक निवडलेल्या हस्तक्षेपांद्वारे गावांना स्वयंपूर्ण बनवण्यासाठी आणि तिथले जीवन आनंददायी आणि शाश्वत करण्यासाठी अथक प्रयत्न करत आहे. नदी पुनरुज्जीवन हा असाच एक हस्तक्षेप आहे.




महाराष्ट्र राज्यपाल माननीय **श्री रमेश बैसच्या** हस्ते पुरस्कार स्वीकारताना **श्री अपूर्व नयन बजाज**

हा पुरस्कार मिळाल्याबद्दल आपले विचार व्यक्त करताना, श्री अपूर्व नयन बजाज म्हणाले, “हा पुरस्कार मिळणे खूप आनंददायी आहे. आम्ही योग्य मार्गावर आहोत हे एक उत्तम समर्थन आहे. पाणी दुर्मिळ आणि खूप मौल्यवान आहे. आणि हे पुरस्कार आम्हाला संभाव्य लाभार्थींच्या मोठ्या संख्येपर्यंत पोहोचण्यास देखील मदत करेल अशी अपेक्षा आहे.”

या कार्यक्रमाला महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची उपस्थिती होती. श्री.फडणवीस आणि श्री.नार्वेकर यांनीही बजाज फाऊंडेशनच्या कार्याचे कौतुक केले.

संस्था काम करत असलेल्या ठिकाणी प्रत्येक व्यक्तीला सिंचन आणि शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याच्या ध्येयासाठी प्रयत्नशील आहे. यशोदा नदीच्या खोऱ्यातील ७00 किमी पेक्षा जास्त पट्ट्याचे पुनरुज्जीवन करून पाण्याची कमतरता असलेल्या भागात जीवन सुसह्य करण्यासाठी फाउंडेशन चे हे प्रयत्न आहेत.

त्याच बरोबर शेकडो छतावरील पावसाचे पाणी साठवण स्ट्रक्चर्स बांधणे आणि विहिरी आणि बोअरवेल्सचे पुनर्भरण या हस्तक्षेपामुळे आत्तापर्यंत, फाऊंडेशनने आपल्या जल प्रयत्नांद्वारे १५00 गावांमधील ८५,000 हून अधिक कुटुंबांच्या (४.५२ लाख लोकांच्या) जीवनाला स्पर्श केला आहे आणि महाराष्ट्र, राजस्थान आणि उत्तर प्रदेश राज्यातील 3.१६ लाख एकर जमीन सिंचनाखाली आणली आहे.

बजाज फाऊंडेशनने माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांची आत्मनिर्भर भारताची दृष्टी स्वीकारली आहे आणि १.२८ लाख कुटुंबांना त्यांच्या १.६५ लाख एकर जमिनीवरील नैसर्गिक शेती पद्धतींचा वापर करून गवकरिंना स्वावलंबी बनण्यास मदत केली आहे.

बजाज फाउंडेशनने केलेल्या कामाच्या अधिक माहितीसाठी
**www.bajajfoundation.org** ला भेट द्या

अधिक माहितीसाठी, कृपया संपर्क साधाः

**संजय ओझा**
उपाध्यक्ष, कॉर्पोरेट कम्युनिकेशन्स
फोन नंबर : ९८३५३१४२४९
ईमेलः
**skojha@bajaj-group.com**

**श्री हरिभाई मोरी**
अध्यक्ष, बजाज फाउंडेशन
फोन नंबरः **९००४०२७५५३**
ईमेलः **hmori@bajajenergy.com**

१0 वा मजला, बजाज भवन, २२६, जमनालाल बजाज मार्ग,
नरिमन पॉइंट, मुंबई, महाराष्ट्र ४000२१